# घरकुल आनंदयात्रा

त्रैमासिक पत्रिका

अंक 3 रा (ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर 2023)



आनंद नगर, त्रिंबक रोड, पिंपळगाव बहुला, नाशिक - ४२२२१३। संपर्क : ९८६०५५२३२४

Email : gharkulparivar@gmail.com l Web : www.gharkulparivar.org


## संपादकीय !


**अंकाविषयी थोडेसे ....**

"घरकुल आनंदयात्रा" या त्रैमासिक पत्रिकेचा हा तिसरा अंक. ऑक्टोबर नोव्हेंबर आणि डिसेंबर 2023 या काळातील महत्त्वाच्या घडामोडी ह्या पत्रिकेद्वारे आपल्यापर्यंत पोहोचवताना संपादक मंडळाला अतिशय आनंद होत आहे. हळूहळू घरकुल परिवारातील सर्व सदस्यांना दर तीन महिन्याच्या घडामोडी या पत्रिकेच्या निमित्ताने कळत आहे . काही खूप मौल्यवान सूचना देखील अंका मधील सुधारणांसाठी येत आहेत. या अंकात काही प्रमाणात या सूचनानुसार बदल करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या सगळ्यांना नम्र विनंती की अंक वाचून आपल्या प्रतिक्रिया कळवा. घरकुल ला भेट द्या आणि मुलींच्या आनंदात सहभागी व्हा.

**-: संपादकीय मंडळ :-**

| | |
|---|---|
| सौ . सुनिता आडके | सौ . साधना देशमुख |
| सौ . विद्या फडके | सौ . वल्लरी प्रधान |
| श्री . नरेश महाजन | सौ . सोनल खाडिलकर |

**!! नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!**



**घरकुल मधील बांबू पासून तयार केलेले पुष्पगुच्छ..**

# चोच देतो तो घरही देतो

"चोच देतो तो फक्त दाणा देतो असे नाही तर घरही देतो" हे घरकुल परिवाराच्या वाटचालीतील एक वास्तव म्हणता येईल. उपनगर जवळील आऊमाऊ बंगला हा काही तांत्रिक व कायदेशीर कारणाने सोडण्याची वेळ आली.

मग आम्ही जागेच्या शोधात दिवसभर असू. मी स्थानिक सर्व वर्तमानपत्र रोज घ्यायला लागले. त्यातील जाहिरातीवरून अनेक जागा शोधू लागले. अखेर पाथर्डी फाट्यावरची आर्मी अधिकारी श्री. भारद्वाज यांचा एक छोटा बंगला पसंत पडला. त्यांनी तो नाममात्र भाड्याने दिला. पाथर्डी फाट्यावरचा हा बंगला आऊमाऊ पेक्षा खूपच लहान होता. तरी आम्ही तो घेतला. इथे फक्त तीनच खोल्या होत्या. मुलींना कॉटवर झोपवणे अवघड होते. त्यामुळे सर्व कॉट आऊमाऊवरच ठेवून यावे लागले. इकडे मुली खाली गाद्या टाकून कशाबशा झोपत होत्या.

दुसऱ्या जागेचा शोधही एकीकडे सुरूच होता. याही बंगल्याच्या परिसरातील रहिवाशी खूप चांगले होते. त्यांनीही खूप सहकार्य केले.

या बंगल्यात एक वॉचमन कुटुंब राहत होतं. त्या बाईनी आमच्या दोन्ही वेळच्या स्वयंपाकाची जबाबदारी स्वीकारली. एक मोठा प्रश्न सुटला . इथले सर्व व्याप सांभाळण्यासाठी देव मावशी, आशाताई, युगंधराची आई... संगीता,सोनाली या सर्वांचे फार मोठे सहकार्य लाभले.मुलींनीही कधी कुरकुर केली नाही की पालकांनी तक्रार केली नाही. भारद्वाज कुटुंबाने आम्हाला चांगले सहकार्य केले. ती जागा सोडण्याचे एकच कारण होतं की ती जागा खूप लहान पडत होती. आणि मुलींची संख्या वाढत होती.

आऊमाऊ सोडताना जसे आम्ही भावुक झालो होतो तसेच पाथर्डी फाटा परिसर सोडतानाही आम्हाला वाईट वाटत होते. तीन वर्षे घरकुल तेथे होते. त्यामुळे येथील रहिवाशांनाही आम्ही सोडून जात आहोत हे कळल्यावर वाईट वाटले. ही जागा सोडताना श्री भारद्वाज यांनी त्यांच्या अनेक वस्तू घरकुलला दिल्या. आऊ माऊ चे मालक श्री गडकरी यांच्या प्रमाणे श्री भारद्वाज यांच्याशी ही स्नेह बंध जुळून राहिला.

असा हा घरकुलच्या कहाणीचा मधला टप्पा होय. पुढे पिंपळगाव बहुलाला कसे आलो ते पुढे पाहूच.

## * आवाहन *

### -: ऑनलाईन देणगीसाठी :-

**देणगीस ८०जी अन्वये आयकरात सुट**

**A/C Name:** Gharkul Parivar Sanstha
**Bank Name:** Bank of India
**Branch:** Shivaji Udyan, Nashik
**A/C No.:** 080610110000256
**IFSC :** BKID0000806

# घरकुलचे आधारस्तंभ



श्री व सौ जांबोटकर

## श्री. मिलिंद जांबोटकर
## मुख्य कार्यकारी अधिकारी,
## स्लाईड वेल

आज पर्यंत देव कधी भेटला नाही व कधी भेटेल का नाही माहित नाही पण देवासारखी माणसं नक्कीच भेटली. अशाच देव माणसांच्या मांदीयाळीतील एक व्यक्तिमत्व म्हणजे **श्री मिलिंद जांबोटकर**

2017 ल पाहून व कामकाज पाहून ते अतिशय प्रभावीत झाले ते म्हणाले आमच्या कंपनीलाही अशा संस्थेला सहकार्य करायला आवडेल.

मी उद्याच येतो साहेबांना घेऊन. खरोखरच ते ठरल्याप्रमाणे स्लाईड वेलचे सर्वे सर्वा मा. श्री मिलिंद जांबोटकरांना घेऊन आले घरकुलचे कामकाज पाहून, समजून घेऊन, त्यांनी लगेच सहकार्याचा हात पुढे केला तो आजवर म्हणजे १७ वर्षे सोडलेला नाही.

घरकुलच्या सर्व मुलींच्या उत्तम तब्येतीच रहस्य आहे ते त्यांना मिळणाऱ्या आहारात, त्यासाठी रोज लागणारा भाजीपाला ,सॅलेड व फळे स्लाईड वेल तर्फे घरपोच दिली जातात. मुख्य सांगायचं तर यातील सातत्य अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी त्यांच्या मॅनेजमेंटचे विशेष कौतुक वाटते.

दरवर्षी येणारे दोन हृद्य सोहळे म्हणजे रक्षाबंधन व दिवाळी. रक्षाबंधनाला ते घरकुल मधल्या सर्व मुलींना, मावश्यांना कंपनीत बोलवतात दारातच प्रत्येक मुलीला गुलाबाचे फुल देऊन स्वागत करून सन्मानित केले जाते. मुली सर्वांना ओवाळतात, राखी बांधतात, फुगे, रांगोळी यांची अतिशय सुंदर व आकर्षक सजावट असते.प्रत्येक भावासाठी पाट,त्यावर टोपी, ओवाळण्याची तबके अशी छान तयारी केलेली असते. प्रत्येकीला भेटवस्तू मिळते. नंतर करमणुकीचे कार्यक्रम आणि स्नेहभोजन असा सारा थाटामाटात सोहळा संपन्न होतो.

दुसरा सोहळा म्हणजे दिवाळी, दिवाळीत या कंपनीचे सर्व पदाधिकारी घरकुलात येतात घरकुलातही त्यांचे रांगोळ्या, कंदील ,दिवे, पणत्या लावून स्वागत होते. मुलींबरोबर फटाके उडवतात. सर्वांबरोबर स्नेहभोजन होते. मुलींना मिठाईचे बॉक्स देतात. अशावेळी या निर्मळ, निरागस मुलींच्या चेहऱ्यावरचा आनंद एखाद्या नंदादीपसारखा उजळून जातो.

घरकुल परिवाराने दोनदा जागा बदलली तेव्हा या स्थलांतराच्या वेळी सामान हलवणे, टेम्पो ठरवणे, वगैरे साठी सर्व मदत या मंडळींनी अतिशय मनापासून केली. सर्वांनाच सामाजिक बांधिलकीची जाणीव व तळमळ आहे. आणि या सगळ्या गोष्टी अगदी साधेपणाने, शांतपणे करतात कशाचाही गाजावाजा नाही.

प्रसिद्धी नावलौकिकाच्या मागे न लागणारे हे व्यक्तिमत्व आहे. शिस्तबद्ध तरीही हसतमुख मदतीसाठी कधीही तत्पर.

त्यांनी त्यांच्या मित्र परिवाराला घरकुलचा परिचय दिल्याने काही कंपन्या घरकुलाशी जोडल्या गेल्या.

त्यांची पुढची पिढी त्यांची मुलगी वल्लरी व जावई अंबर प्रधान हे तेवढ्याच आपुलकीने घरकुलाशी जोडलेले आहेत.श्रीमती निताताई जांबोटकरही घरकुलच्या ट्रस्टी आहेत.

घरकुलाच्या अर्थपूर्ण वाटचालीत जांबोटकर कुटुंबीय आणि स्लाईड वेल कंपनीतील सर्व सदस्य यांचा वाटा मोठा आहे. घरकुल परिवार संस्थेचे माननीय जांबोटकर साहेब मजबूत आधारस्तंभ आहेत. त्यांना घरकुल तर्फे कृतज्ञतेचा नमस्कार .

श्रीमती.विद्या फडके
सचिव
घरकुल परिवार संस्था

## एकेकीची गोष्ट :- योजना गोखले

योजना घरकुल ची जुनी विद्यार्थिनी 2008 मध्ये ती घरकुल मध्ये दाखल झाली. मूळची डोंबिवलीची असलेली योजना ही बॉर्डर लाईन ची विद्यार्थिनी.आऊ माऊ मध्ये घरकुल ने सुरुवातीला जे या मुलींचे निवासी शिबिर घेतले त्यात ती सहभागी झाली होती.

योजनाच्या आई-वडिलांच्या पश्चात तिची थोरली व धाकटी बहीण तिला सांभाळत होत्या. घरकुल मध्ये झालेल्या शिबिरात तिला मैत्रिणी मिळाल्या मुळात बोलकी असलेली योजना तिच्या तीक्ष्ण अशा स्मरणशक्तीने घरकुलच्या मावश्यांना विद्या ताईना खूप आवडली योजना ने तिच्या बहिणींना सांगून टाकले की मी आता इथेच राहणार आपापल्या संसारात रमलेल्या पण तरीही योजनाची काळजी घेणाऱ्या दोन्ही बहिणींना तिच्या या निर्णयाने दिलासा मिळाला तेव्हापासून आजतागायत योजना घरकुल मध्ये आहे दिवाळीच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत ती बहिणींकडे जाते पण तिला घरकुल शिवाय कुठेच करमत नाही. योजना हळूहळू घरकुल मधील विविध जॉब वर्क शिकून त्यात पारंगत झालीच पण त्याचबरोबर विद्या ताईनी तिच्यातील पाठांतर आणि स्मरणशक्तीचा अंगभूत गुण ओळखला आणि तिला सुरुवातीला काही छोट्या कविता म्हणायला आणि पाठ करायला शिकवले. तिलाही आपल्याला हे येत हे कळल्याने आनंद झाला. आज योजना ताई घरकुल मध्ये नवीन मुलींना पेन जोडणीच्या कामात मार्गदर्शन करते, हे काम ते स्वतः पण खूप सिन्सिअरली करते. घरकुल मधल्या सगळ्या मुली ताया मावश्या यांचे वाढदिवस तिच्या स्मरणात आहेत.

कुसुमाग्रजांची ,"फक्त लढ म्हणा" ही कविता असो किंवा गुरु ठाकूर यांची "आयुष्याला द्यावे उत्तर" ही कविता ,योजना केव्हाही पाठ म्हणून दाखवू शकते. नुकतीच तिने एका राष्ट्रीय स्तरावरील कविता वाचन स्पर्धेसाठी हिंदीतील हरिवंशराय बच्चन यांची "कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती" ही कविता सादर केली. हिंदीत कविता सादर करणे ही मुळीच सोपी गोष्ट नव्हती मात्र सोनल ताईने तिला या कवितेचा अर्थ समजावून सांगितला तिने अर्थ समजून घेऊन योग्य शब्दोच्चारासह ती कविता पाठ करून स्पर्धेत सादर केली ही विशेष कौतुकाची बाब !

अशी आमची योजना गोखले हे एक गुणी विद्यार्थीनी आहे



### -: विश्वासू सहकारी :-
### सौ . करुणा भिडे

करुणा घरकुल मध्ये 2016 मध्ये रुजू झाली. सर्व मुलींची ती प्रेमळ अशी करुणाताई आहे. करुणाने बीएसडब्ल्यू (बॅचलर ऑफ सोशल वर्क) व एम ए समाजशास्त्र यामध्ये शिक्षण पूर्ण केले आहे. घरकुल मध्ये ती सुपरवायझर या पदावर कार्यरत आहे. घरकुल मध्ये आलेल्या विद्यार्थिनींचे सर्व रेकॉर्ड ठेवणे, रजिस्टर अपडेट ठेवणे, घरकुल मध्ये येणाऱ्या पाहुण्यांना घरकुल विषयी माहिती देणे, सर्व स्टाफच्या कामावर देखरेख ठेवणे ,संबंधित स्टाफ कडून व्यवस्थितपणे ठरवलेली कामे करून घेणे, दैनंदिन कामाविषयीचे रिपोर्टिंग फडके मॅडम ना करणे, त्यांच्याकडून मिळणारी माहिती स्टाफ विद्यार्थिनी व मावश्यांपर्यंत पोहोचवणे असे एक प्रकारचे दुवा जोडण्याचे काम करुणाचे असते. अंगभूत नम्र व प्रेमळ स्वभावामुळे ती हे काम अगदी उत्तमरीत्या पार पाडते. याशिवाय मुलींसाठीच्या जेवणाचा साप्ताहिक मेन्यू ठरवणे स्वयंपाकाची चव घेऊन चव रजिस्टर मध्ये त्याबद्दलचा अभिप्राय लिहिणे, मुलींच्या कोणत्याही प्रकारच्या समस्या, प्रगती इत्यादी विषयी पालकांना माहिती देणे हे सुद्धा करुणाताईचेच काम असते. करुणाच्या स्वभाव सौम्य व आवाज गोड आहे त्यामुळे छोट्या मोठ्या नव्या जुन्या सर्व मुलींची तिची लवकर गट्टी जमते. सुपरवायझर म्हणजे आपण कोणीतरी "सुप्रीम"
आहोत असा तिचा अविर्भाव नसतो. घरकुल वर सगळ्या ताया मावश्या वर मुख्य म्हणजे घरकुलच्या मुलींवर तिचा खूप जीव आहे करुणासारख्या विश्वासू प्रेमळ सहकाऱ्यांमुळेच घरकुल एक विस्तारित कुटुंब म्हणून उभे आहे.

## कृतज्ञतेचा नमस्कार...

एखाद स्वप्न पुर्ण करण्याचा जेव्हा आपण मनापासून ध्यास घेतो तेव्हा ते स्वप्न पुर्ण करण्यासाठी सगळ विश्व तुम्हाला साहाय्यभूत होत. अस म्हणतात ते खोट नाही. घरकुल सुरू झाल्यापासुन ते आतापर्यंत अनेक कंपन्या व्यक्ति संस्था यांच्याकडून वेगवेगळ्या स्वरुपात योगदान व सहकार्य मिळाले. त्यामुळे १७ - १८ वर्षाचा हा प्रवास सोपा झाला. समाजाच्या सर्व स्तरातून मिळालेल्या सहयोगामुळे, प्रेमामुळे आमच्या मुलींना आम्हाला आनंददायी व दर्जेदार वातावरण देता आलेय यामुळे घरकुल रुढार्थाने एक संस्था न राहाता एक मोठ संयुक्त कुटुंब बनलं आणि आश्वासक वाटचाल करित आहे. त्यासाठी भविष्यातही आपणा सर्वांची साथ सहकार्य जिव्हाळा हवा आहे. आपल्या प्रत्येकाच्या प्रति आमच्या मनातल्या भावना शब्दात मांडणे कठीण आहे. मात्र आपल्या प्रत्येकाच्या प्रेमाची नोंद आम्ही मनोमनी जपत राहू. सर्व ज्ञात, अज्ञात मान्यवरांना, हितचिंतकांना, देणगीदारांना धन्यवाद व कृतज्ञतेचा नमस्कार! घरकुल आपल्या सर्वांप्रती ऋणी आहे. तसेच आपणा सर्व मान्यवरांचे स्नेहीजनांचे घरकुलात कायम स्वागत आहे.

# कार्यक्रम आणि भेटीगाठी

## ऑक्टोबर 2023

- सुभद्रा नेत्रालय काठे गल्ली नाशिक येथील डॉक्टर स्वप्नील विधाते व सहकारी यांच्यातर्फे घरकुलच्या सर्व मुली व स्टाफच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली तसेच महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.
- ग्राहक पंचायत मुंबई येथे घरकुलचा स्टॉल लावण्यात आला येथे घरकुलच्या प्रॉडक्ट्स ना भरपूर प्रतिसाद मिळाला व विक्री ही झाली हा एक अतिशय चांगला अनुभव घरकुलच्या ताई न मिळाला या स्टॉलमध्ये योगिताताई आणि करूणाताई यांनी अतिशय मन लावून काम केले.
- रोटरी क्लब पुना वेस्ट यांच्यातर्फे आयोजित केलेल्या सृजन या प्रदर्शनात देखील घरकुलच्या वेगवेगळ्या प्रॉडक्ट्स चा स्टॉल लावण्यात आला. दिवाळी जवळ असल्यामुळे आकाश कंदीलांना चांगला प्रतिसाद मिळाला.
- फ्रेंडशिप फोर्स ऑफ कॅन्सास USA च्या सदस्यानी श्री उमेश राठी सर यांचे बरोबर घरकुल ला भेट दिली. या सर्व पाहुण्यांनी घरकुल चे उपक्रम जाणून घेतले. मुलींनी बनवलेल्या वस्तू त्यांनी खरेदी केल्या व संस्थेस देणगी दिली. त्यांनी सर्वांनी संस्थेच्या कामाची विशेष प्रशंसा केली.
- इंटरनॅशनल लाफ्टर क्लब हेल्थ अँड हॅपिनेस चे संचालक डॉ.मदन कटारिया यांच्यासोबत विविध देशातील 130 सदस्यांनी घरकुल ला भेट दिली. या परदेशी पाहुण्यांनी मुलींनी तयार केलेल्या बऱ्याच वस्तूंची खरेदी केली व त्यांना या वस्तू खूप आवडल्या.

## नोव्हेंबर 2023

- दिवाळी निमित्त k.k. college of engineering व ABB येथे घरकुलच्या विविध वस्तूंचा स्टॉल लावण्यात आला होता, येथे आकाश कंदील तोरण फराळाचे पदार्थ यांना चांगला प्रतिसाद मिळाला या निमित्ताने घरकुलाच्या विद्यार्थिनींना एक वेगळा अनुभव सुद्धा मिळाला.
- गुंज फाउंडेशन नाशिक यांच्यातर्फे घरकुल मध्ये दिवाळी साजरी करण्यात आली या फाउंडेशनच्या सदस्यांनी मुलींचे मनोरंजन करण्यासाठी गाणी सादर केलीत सर्वांना ड्रेस गिफ्ट देण्यात आले व त्यानंतर मुलींबरोबर फटाके फोडण्यात आले. त्यांनी मुलींसाठी पावभाजी चा स्टॉल लावला होता सर्व मुलींनी या सेलिब्रेशनचा मनापासून आनंद घेतला.
- विद्यार्थिनींना 8 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर दिवाळीच्या सुट्ट्या देण्यात आल्या. मुलींना नेण्यासाठी आलेल्या पालकांची मीटिंग घेण्यात आली व पालकांना नेहमीप्रमाणे मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक तरतूद करण्याविषयी विचार मांडला गेला. काही विद्यार्थिनी घरकुल मध्येच राहणाऱ्या असतात त्यांच्यासाठी घरकुलच्या ताई मावशी यांनी जवळपासच्या ठिकाणी पिकनिक आयोजित केली.
- यादरम्यान अनेकांनी स्वतःचे अथवा कुटुंबीयांचे वाढदिवस देखील साजरे केले.

## डिसेंबर 2023

- येवल्याचे कापसे पैठणीचे संचालक श्री बाळकृष्ण कापसे यांनी घरकुल ला भेट दिली घरकुलचे स्नेही श्री रघुवीर अधिकारी यांच्या मुळे ही भेट घडून आली. श्री कापसे यांनी घरकुलच्या कामाची माहिती घेतली आपल्या विद्यार्थिनी करत असलेलं काम पाहिल्यावर त्यांनी या विद्यार्थिनी हातमागावर पैठणी विणकाम करू शकतील असा विश्वास दर्शवला व याविषयीचे प्रशिक्षण येवल्याला कापसे फाउंडेशन तर्फे दिले जाते याविषयी माहिती दिली .
- SMRK महिला महाविद्यालयाच्या human development च्या पाच विद्यार्थिनी एक महिन्याच्या intership साठी घरकुल मध्ये काम करण्यासाठी आल्यात.

# कार्यक्रम आणि भेटीगाठी

- मराठीतील प्रसिद्ध अभिनेत्री अनुराधा राज्याध्यक्ष, त्यांचे बंधू श्री रवींद्र मोडक मुलगा अनुराग राज्याध्यक्ष यांनी घरकुल ला भेट दिली. अनुराधाताईंचे मनाचे श्लोक यूट्यूब वरून घरकुल मध्ये दररोज मुलींना ऐकवले जातात. त्यांनी मुलींशी गप्पा मारल्या.
- घरकुल संस्थेचे हितचिंतक स्लाईड वेल कंपनीचे श्री मिलिंद जांबोटकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने घरकुलच्या विद्यार्थिनीं व स्टाफ ला निमंत्रित केले होते घरकुलच्या विद्यार्थिनी व स्टाफ मेंबर या कार्यक्रमाला उपस्थित होते विद्यार्थिनींनी पारंपारिक नृत्य व गीत सादर केले व जांबोटकर सरांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचा आनंद घेतला व त्यानंतर जेवणाचा आस्वाद घेतला.
- पुस्तकांचे हॉटेल च्या संचालिका भिमाबाई जोंधळे यांच्या ओझर येथील अक्षरबंध प्रकाशन संस्थेत सन्मान सोहळा विद्या ताई ना निमंत्रित केले होते या ठिकाणी त्यांना सन्मानित करण्यात आले.
- खानदेश महोत्सवामध्ये दिनांक २२ ते २५ डिसेंबर दरम्यान घरकुल चा स्टॉल लावण्यात आला. स्टॉलला अनेक नाशिककरांनी भेट दिली. यामुळे जास्तीत जास्त नाशिककरांपर्यंत घरकुलच्या कामाविषयीची माहिती पोहोचवता आली .

## आनंद यात्रेतील क्षणचित्रे




पुस्तकांचे हॉटेल मधील सन्मान सोहळ्यात विद्या ताई फडके यांना सन्मानित करण्यात आले



पल्लवी जोशी यांच्या सल्ल्याने अग्निहोत्र यज्ञ घरकुलात सुरु केले.



अभिनेत्री अनुराधा राजाध्यक्ष यांनी संस्थेला भेट दिली.



अरुण मांजरे सर यांनी घरकुलला भेट दिली.

# आनंद यात्रेतील क्षणचित्रे



शुभद्रा नेत्रालयतर्फे घरकुल मधील विद्यार्थिनी व स्टाफ ची नेत्र तपासणी शिबीर



मुंबई ग्राहक पंचायत (अंधेरी) आयोजित सेतू बांधा रे येथे घरकुलचा स्टॉल लावण्यात आला.



फ्रेन्डशिप फोर्स ऑफ कॅन्सास USA यांनी घरकुलला भेट दिली.



international laughter club च्या विविध देशातील १३० सदस्यांची घरकुलला भेट दिली.



गुंज फौंडेशन ग्रुप तर्फे दिवाळी सेलिब्रेशन

# आनंद यात्रेतील क्षणचित्रे



slidewell meilleur tech तर्फे घरकुल मध्ये दिवाळी साजरी करण्यात आली.



येवला येथील सुप्रसिद्ध कापसे पैठणीचे संस्थापक श्री बाळकृष्ण कापसे यांनी घरकुलला भेट दिली .



जागतिक अपंग दिनानिमित्त "जिम पोरी झिम्म" या ग्रुपने मंगळागौरीचे खेळ सादर केले.



रिटायर्ड शिक्षिका साने आजी यांची घरकुलला भेट.



जागतिक अपंग दिनानिमित्त घरकुलच्या विद्यार्थिनींसाठी Funny Game चे आयोजन करण्यात आले



योशी पापड प्रा.ली.च्या संस्थापिका श्रीमती छाया जोशी मॅडम व मुलगी निशा लाखे यांनी घरकुलला भेट दिली.